# गांधी विचार परिषद, वर्धा

(स्व. श्री जमनालाल बजाज स्मृत्यर्थ)

दिनांक : १२ जुलै, 2018

II-12| |2018-19

**प्रिय मित्र,**

गेल्या काही वर्षापासून विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी भारताच्या निरनिराळ्या भागांत "गांधी विचारांचा व त्यांच्या कार्याचा" परिचय करुन देण्याच्या हेतुने अल्पकालीन अभ्यास सत्रांचे आयोजन गांधी विचार परिषदे तर्फे सातत्याने केला जात आहे.

अल्पकालीन व दीर्घकालीन अभ्यासक्रमांचे आयोजन करणे, गांधी विचारांचे अध्ययन करु इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व सल्ला देणारी सुविधा केन्द्र उपलब्ध करुन देणे व त्या संबंधी निर्मिती करणे हा गांधी विचार परिषदेचा हेतू आहे.

महाराष्ट्रातील विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी या वर्षी **२१ सप्टेंबर (शुक्रवार) ते २६ सप्टेंबर (बुधवार)** २०१८ या कालावधीत सहा दिवसांचे अल्पकालीन शिबिर आयोजित करण्याचा मानस आहे. या शिबिराद्वारे शिबिरार्थ्यांना गांधी तत्वज्ञानाचे दर्शन व सखोल अध्ययन करण्याची संधी प्राप्त करुन दिली जाईल.

या शिबिरातील चर्चा व अध्ययनाचे माध्यम मराठी व हिन्दी असेल. या पत्रासोबत शिबिराची माहिती देणारे सूचना पत्र जोडले आहे.

हे पत्रक आपल्या विद्यापीठाच्या/महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्याची मी या पत्राद्वारे आपणास विनंती करीत आहे. आपल्या विद्यापीठातून/महाविद्यालयातून फक्त **दोन योग्य युवांची (युवक/युवती)** निवड करुन आमच्याकडे सोबतच्या पत्रकातील आवेदन पत्र त्यांच्या पत्त्यांसह पाठविल्यास आम्हाला त्यांचेशी संपर्क साधता येईल. शिबिरातील चर्चा परिणामकारक व्हावी व प्रत्येकाला शिबिरात सहभागी होता यावे या हेतुने विद्यार्थ्यांची संख्या मर्यादा ४० ठेवली आहे.

शिबिरार्थ्यांच्या प्रवास भाड्याचा व्यय आपल्या विद्यापिठाने/महाविद्यालयाने किंवा शिबिरार्थ्यांने करावा. शिबिर काळातील वास्तव्य व भोजनादिंची सोय संस्थेतर्फे निःशुल्क केली जाईल.

शिबिरार्थ्यांना काही कला/छंद अवगत असल्यास त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी करुन घेता येईल.

शिबिराचे आयोजन सुलभ करण्याच्या हेतूने ज्या विद्यार्थ्यांना आपल्याला शिबिराला पाठवावयाचे आहे त्यांची **नावे व संपूर्ण पत्ते २५ ऑगस्ट, २०१८** पर्यंत आमचेकडे आल्यास आम्हाला त्यांचेशी सरळ संपर्क साधणे सोईचे होईल. आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत.

धन्यवाद.

**आपला विनित,**

**(भरत महोदय)**
संचालक

**सहपत्रः** पत्रकाच्या दोन प्रती

**प्रति,**

____________________

____________________

____________________

**GOPURI, WARDHA – 442 001 (Maharashtra)** India
▪ **Tel.** 07152-243585, 240315 ▪ **Telefax:** 07152-240315 ▪
▪ **E-mail:-** igsgvp@gmail.com / igsgvp@yahoo.com ▪
▪ **Website:** www.gvpwardha.in ▪